आधुनिक विचारांचे

# वर्तमान



मंद प्रकाश चंद्र-चांदण्यांचा
सोबतीला आस्वाद गोड दुधाचा,
विश्वास वाढु द्या नात्याचा
सोबत गोडवा असू द्या साखरेचा,

कोजागिरी पौर्णिमेच्या
हार्दिक शुभेच्छा!

बीड । मंगळवार, १९ ऑक्टोबर २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ५१ । पाने : ४ । मूल्य २ ₹

# हिंदुत्वाच्या अजेंड्यावर गोव्यात ‘मगो’शी जुळवून घ्या

## भाजप हायकमांडच्या गोवा प्रभारी देवेंद्र फडणवीस यांना सूचना





▶ बाबा श्रीहरी देशमाने

पणजी : गोवा भाजपा बरोबर युती करण्यात कोणताच पक्ष धजावत नसल्याने भाजपाच्या हातून गोवा राज्य निसटून जाईल, याची भीती भाजपा हायकमांडला वाटत आहे. त्यामुळे हिंदुत्वाच्या मुद्दावर कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाशी जुळवून घ्या, अशा स्पष्ट सूचना केंद्रीय नेतृत्वाने गोवा भाजपा प्रभारी देवेंद्र फडणवीस यांना दिल्या असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

गोव्यात होवू घातलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरूवात केली आहे. गोव्याच्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने उडी घेतल्याने राजकीय गणिते बदलण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

गोव्यात सत्तारूढ भाजप सरकारला सर्वच पक्षांनी कोंडीत पकडण्याची व्यूहरचना आखली आहे. सद्यस्थितीत गोवा भाजपा समवेत युती करण्यास कोणताच पक्ष पुढे येत नसल्याने भाजपा पक्षश्रेष्ठींनी ही बाब गंभीरपणे घेतली आहे. हिंदुत्वाच्या मुद्दावर महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाशी जुळवून घेवून युती करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, अशा स्पष्ट सूचना नवी दिल्लीतील भाजपा हायकमांडने गोवा प्रदेश भाजपाला दिल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मात्र महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष भाजपशी संधान बांधण्यास अजिबात तयार नाही. मगोचे सर्वोच्च नेते तथा माजी उपमुख्यमंत्री सुदिन ढवळीकर यांनी भाजपशी युती करणे म्हणजे राजकीय आत्महत्याच होय, अशी खोचक प्रतिक्रिया देवून अप्रत्यक्ष भाजपचा प्रस्ताव धुडकावला आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा गोवा भाजपा प्रभारी देवेंद्र फडणवीस यांनी मात्र प्रादेशिक पक्षाच्या युतीबाबत चर्चेचे सर्व पर्याय खुले असल्याचे सांगितले आहे.

### तृणमूल काँग्रेस सक्षम पर्याय : प्रतिभा बोरकर



गोव्यातील जनता भाजप सरकारला कंटाळली आहे. सामान्य गोमंतकीयांना सत्तांतर हवे आहे. त्यासाठी तृणमूल काँग्रेस हा सक्षम पर्याय निर्माण झाला आहे. गोव्यात तृणमूल काँग्रेसची वाढती ताकद लक्षात घेता आगामी निवडणुकीत तृणमूल काँग्रेस चमकदार कामगिरी करेल, अशी प्रतिक्रिया ’वर्तमान’शी बोलताना तृणमूल काँग्रेसच्या नेत्या प्रतिभा बोरकर यांनी दिली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : ’शिवगड’ २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# बीड जिल्ह्याला भरीव मदत

## ६३४ कोटींचा निधी दिवाळीपूर्वी मिळणार?

▶ प्रतिनिधी

बीड : अतिवृष्टीच्या संकटात सापडलेल्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. मराठवाड्यात बीड जिल्ह्याला सर्वाधिक ६३४ कोटी रूपयांची मदत मिळणार असल्याने शेतकऱ्यात मोठे समाधान व्यक्त केले जात आहे. दरम्यान, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत मिळेल अशी माहिती शासनाच्या सूत्रांनी दिली आहे.

मराठवाड्यात ४७ लाख शेतकऱ्यांचे ३६ लाख ६२ हजार ७८२ हेक्टरवरील पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. नुकसान भरपाईसाठी २५८५ कोटी रूपयांची गरज एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे असतानाच बुधवारी राज्य शासनाने जाहीर केलेल्या १० हजार कोटींच्या पॅकेजमधून विभागाला सुमारे ३७०० कोटी रूपये मिळण्याची शक्यता आहे. ९७५ कोटी रुपये एनडीआरएफच्या निकषांच्या तुलनेत जास्तीचे मिळणार असून, बीड जिल्ह्याला सर्वाधिक ६३४ कोटींची मदत मिळणार आहे. मराठवाड्यात ७ सप्टेंबर ते ७ आक्टोबरदरम्यान गुलाब वादळाच्या परिणामांसह झालेल्या अतिवृष्टीमुळे एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेले क्षेत्र वाढले आहे. राज्यशासनाने १० हजार कोटींचे पॅकेज तातडीची मदत म्हणून जाहीर केले असले तरी यात मराठवाड्यातील नुकसान पाहता ३७०० हजार कोटी त्यातून मिळणे शक्य आहे. जिरायती क्षेत्रासाठी हेक्टरी १० हजार, बागायतीसाठी १५ हजार तर फळपिकांसाठी २५ हजार हेक्टरी मदत राज्यशासन देणार आहे. औरंगाबाद जिल्ह्यात ५५५ कोटी रूपये, जालना जिल्ह्यात जिरायती क्षेत्रासाठी ४७७ कोटी रूपये, परभणीत ३३८ कोटी रूपये, हिंगोलीत २९४ कोटी रूपये, नांदेड ५५१ कोटी रूपये, लातूर ४३४ कोटी रूपये, उस्मानाबाद ३०५ कोटी रूपयांची मदत मिळणार आहे. यात विभागातील १०२ कोटी बागायत आणि १२५ कोटी फळबागांच्या नुकसानीसाठी असणार आहे.



असा मिळेल बळीराजाला आधार

| | |
|---|---|
| जिरायतीसाठी १० हजार रूपये प्रति हेक्टर | बागायतीसाठी १५ हजार रूपये प्रति हेक्टर |
| बहुवार्षिक पिकांसाठी २५ हजार रूपये प्रति हेक्टर | ही मदत २ हेक्टर मर्यादित करण्यात येईल. |

## फास्टट्रॅकन्यूज

### धनादेश न वटल्याप्रकरणी एकाला ३ महिन्यांची शिक्षा



माजलगाव : येथील तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटच्या थकीत कर्जापोटी दिलेला धनादेश न वटल्यामुळे न्यायालयाने आरोपी अनिल नामदेव भालेराव (रा.माजलगाव) यास दोषी ठरवून ३ महिन्यांचा कारावास व ३४ हजार ८०० रूपये दंडाची शिक्षा सोमवारी सुनावली आहे. तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेटने अनिल भालेराव यास कर्ज दिले होते. या कर्जाचे हप्ते थकत गेल्यामुळे भालेराव याने वसुलीपोटी रक्कम २८ हजार ५०० रूपयांचा धनादेश तुळजाभवानी सोसायटीच्या हक्कात दिला होता. परंतु आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे हा धनादेश वटला नाही. त्यामुळे सोसायटीने २ फेब्रुवारी २०१७ रोजी अनिल भालेराव विरुद्ध माजलगाव न्यायालयात फिर्याद दिली होती. फिर्यादीत सोसायटीचा पुरावा ग्राह्य धरून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस.एम.जाधव यांनी तुळजाभवानी अर्बन सोसायटीच्या थकीत कर्जापोटी दिलेला धनादेश न वटल्यामुळे आरोपी अनिल नामदेव भालेराव याचा बचाव फेटाळून भालेराव यास ३ महिन्यांची शिक्षा सुनावली. सोसायटीच्या वतीने वकील म्हणून ॲड.व्ही. व्ही.फपाळ, ॲड.टी.एन.कोल्हे व ॲड.पी.पी.गोंडे यांनी काम पाहिले.

### यंदा डिसेंबरमध्येही बरसणार मुसळधार

पुणे : यंदा डिसेंबरमध्ये चक्रीवादळाची शक्यता आहे. त्यामुळे मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात डिसेंबर-जानेवारीत मोठ्या पावसाची शक्यता आहे, असा दावा हवामानशास्त्रज्ञ प्रा.किरणकुमार जोहरे यांनी केला आहे. गेल्या काही वर्षापासून मान्सूनचा पॅटर्न बदलला आहे, तसेच बंगालचा उपसागर व अरबी समुद्रात चक्रीवादळांची संख्या वाढत आहे. प्रा. जोहरे यांच्या दाव्यानुसार यंदा मान्सून २८ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरला महाराष्ट्रात सुरू झाला. त्याचा चार महिन्यांचा कालावधी मोजला तर यंदा जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मान्सूनचा मुक्काम राहील.

### दाक्षिणात्य कलावंतांनी माजलगावकरांचे लक्ष वेधले



माजलगाव : राजस्थानी सत्संग सेवा मंडळ आयोजित श्री बालाजी भगवान प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त बायपास रोड माजलगाव येथे दाक्षिणात्य कला सादर करताना केरळीयन लोककलावंत. (छायाचित्र : विक्रम राजमाने)

# चाटगावकरांचा पुन्हा विश्वासघात कराल तर निवडणुकांवर बहिष्कार

## राष्ट्रवादीचे युवा नेते गोविंद केकान यांचा खणखणीत इशारा

▶ प्रतिनिधी



धारूर : तालुक्यातील चाटगाव जोडरस्ता दुरूस्तीचे काम त्वरित सुरु करण्याची ठोस आश्वासन मिळाल्याने चाटगावकरांचा रास्ता रोको तुर्त स्थगित केलेला आहे. मात्र प्रशासनाने चाटगावकरांचा पुन्हा विश्वासघात केला तर आगामी सर्व निवडणुकांवर चाटगावकर एकजुटीने बहिष्कार घालतील. असा खणखणीत इशारा राष्ट्रवादीचे युवा नेते गोविंद पांडुरंग केकान यांनी दिला आहे.

बीड-परळी महामार्गालगत असलेल्या चाटगाव जोडरस्ता दुरूस्तीचे काम गेल्या दशकापासून रखडलेले आहे. या प्रश्नी चाटगावकर आक्रमक होवून बीड-परळी महामार्गावर चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. ग्रामस्थांची एकजूट पाहून प्रशासनाने नमते घेतले. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांनी आंदोलक भाजपा युवा नेते बालासाहेब केकान यांना भेटून रस्त्याचे काम त्वरित करण्याचे ठोस आश्वासन मंजुरी पत्रात देण्यात आले.

त्यानुसार ग्रामस्थांच्या सहमतीने संबंधित आंदोलन मागे घेण्यात आले. दरम्यान, या रस्त्याचे काम वेळेत पूर्ण न केल्यास आणि पुन्हा चाटगावकरांचा प्रशासनाने विश्वासघात केला तर येणाऱ्या आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांवरील एकजुटीने बहिष्कार घालता जाईल, असा इशारा ’वर्तमान’शी बोलताना राष्ट्रवादीचे युवा नेते गोविंद केकान यांनी दिला आहे.

# जीवनातील उत्कर्षासाठी सदाचारी व्हा

## चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज यांचे आशीर्वचन

▶ प्रतिनिधी



माजलगाव : आजच्या धकाधकीच्या युगात अध्यात्मिक ज्ञानाची गरज आहे. प्रत्येकाने जीवनाचा उत्कर्ष घडविण्यासाठी सदाचाराशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे मठाधिपती चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज यांनी केले. ते दसरानिमित्त समाज बांधवांना मार्गदर्शन करताना शुक्रवारी बोलत होते.

दसऱ्यानिमित्त श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठामध्ये पालखी मिरवणुकीसह विविध धार्मिक कार्यक्रम झाले. यावेळी समाज बांधवांना चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज यांनी शुभआशीर्वाद दिले. पुढे बोलताना चंद्रशेखर शिवाचार्य महाराज म्हणाले, विज्ञान युगात मानवाने कितीही प्रगती केली असली तरी सर्वांगीण विकासासाठी अध्यात्माशिवाय पर्याय नाही. मुलांना शिक्षणाबरोबरच अध्यात्मिक संस्काराची जोड देणे गरजेचे आहे. धार्मिक क्षेत्रात याहीपेक्षा भरीव कार्य करण्याची गरज आहे. त्यासाठी समाजाने एकसंघ रहावे, असेही आवाहन चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ओंकार खुर्पे, सुचेंद्र महाजन, नितीन शेटे, विश्वनाथ शेटे, सुमित मिटकरी, गणेश तोडकरी यांच्यासह समाज बांधवांनी परिश्रम घेतले.



वर्तमान
प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

संपादकीय

# कौटुंबिक समजदारी काळाची गरज

आज आधुनिक युगात एकत्र कुटुंब पध्दती दुरापास्त झाल्याचे दिसते. एकत्र कुटुंबात मुलांची जास्त घुसमट होते, असे देखील काही ठिकाणी निदर्शनास येते. घरातील ठराविक सदस्यांचे आपसात असलेले वादंग, हेवे-दावे, मत्सर, कलह, अबोला यात मुलांनी पण सहभागी व्हावे, अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. आपली मतं मुलांवर लादणे, आपण ज्यांना वाईट म्हणतो त्यांना मुलांनी पण वाईटच म्हटले पाहिजे, अशी जबरदस्ती मुलांवर करणे योग्य नाही. मुलांना मार्गदर्शन करणे, सल्ला देणे, संभाव्य धोके लक्षात आणून देणे आपले कर्तव्य आहे; पण मुलांनी आपल्या चुकीच्या प्रकरणांमध्ये आपलीच बाजू उचलून धरावी, आपण कितीही अयोग्य असलो तरी मुलांनी आपलंच अनुकरण करावं, घरात आपल्या चुकांमुळे घडणाऱ्या चुकीच्या प्रसंगात आपलीच साथ द्यावी, कारण आपण त्यांचे आई-बाप आहोत, ही अपेक्षा कितपत योग्य आहे? मुलामध्ये निरपेक्ष विचार करण्याची सवय, भेदभाव न करण्याची सवय, माझं-तुझं, आम्ही-तुम्ही न करण्याची सवय आपणच जर त्यांच्या वाढत्या वयात लावली, तर नक्कीच त्यांची निकोप वाढ होऊ शकेल. अनेकदा मुलांकडून कोणतीही चूक झाली, तर पत्नीने पतीच्या किंवा पतीने पतीच्या खानदानाचा उद्धार करणे, एकमेकांच्या खानदानाला दोष देऊन मुलांना कमी लेखणे, मुलांसमोर घरातील, नात्यातील इतर सदस्यांबद्दल अपशब्द बोलणे अत्यंत चुकीचे आहे. मुलांच्या मनात कोणाविषयी विष पेरणे, त्यांची मनं कलुषित करणे, त्यांच्यासमोर सातत्याने नकारात्मक विषयावर बोलणे, सावधपणा शिकविण्यापेक्षा त्यांच्या मनात भीती तयार करणे, त्यांच्यात सूडबुद्धी रुजवणे, यामुळे मुलं देखील तसाच विचार करू लागतात आणि त्यांच्या पुढील भविष्यावर, पुढील आयुष्यावर याचा कळत-नकळत परिणाम होत जातो. कदाचित, पती-पत्नीमधील वाद, गैरसमज तात्पुरत्या स्वरूपाचे असू शकतात. शाब्दिक चकमकीनंतर ते परस्परांशी पुनःश्च व्यवस्थित वागायला लागतात, पण मुलांनी हे सर्व लक्षात ठेवलेले असू शकते. ज्या वेळी पती-पत्नी मुलांसमोर एकमेकांना कायदेशीर प्रक्रियेची धमकी देणे, मुलांना धमकावणे, दम देणे, त्यांच्यावर दबाव टाकणे, अथवा तसा प्रयत्न करणे या कृती करतात, एकमेकांना सोडून द्यायची किंवा वेगळं होण्याची भाषा करतात, तेव्हा मुलांच्या मन:स्थितीचा विचार केला जात नाही. घरातील अथवा ऑफिसमधील कुरबुरींचा राग मुलांवर काढणे, घरातील वडीलधाऱ्या माणसांचा मुलांसमोर अपमान करणे, पती-पत्नींनी भांडताना किंवा बोलताना असभ्य भाषा वापरणे, सातत्याने एकमेकांवर आरोप करत राहणे, आपल्या चुकांचे समर्थन करीत राहणे, आपल्या भांडणांमुळे अपत्यांकडे दुर्लक्ष करणे, आपल्या बिघडलेल्या मनःस्थितीचा परिणाम मुलांच्या संगोपनावर होऊ देणे, यामुळे मुलांच्या मनावर खूप विपरीत परिणाम होतात. त्यामुळे मुलं एकलकोंडी होणे, कुटुंबातील व्यक्तींशी संवाद-संपर्क-भेटीगाठी टाळणे, घरगुती सभारंभात सहभागी न होणे, स्वतःचा जास्तीत जास्त वेळ सोशल मीडियावर अथवा घराबाहेर घालवणे, असे पर्याय घरातील कटकटीला वैतागून निवडतात. एकदा मुला-मुलींचं लक्ष घरातून उडालं की, त्यांना बाहेरचं जग, मित्र-मैत्रिणी खूप चांगल्या वाटू लागतात. बाहेरील संपर्कात आलेली व्यक्ती आणि तिचा हेतू चांगला असेल, तर ठीक अन्यथा घरातील अतिरिक्त बंधन, हुकूमशाही मोडून काढण्याकरिता खोटं बोलणे, खोटं कारण सांगून घरातून कुठेही जाणे, व्यसन करणे, अपघात घडणे, आत्महत्या करणे, चुकीच्या व्यक्तीच्या आहारी जाऊन वाईट सवयी आत्मसात करणे, नको त्या वयात प्रेम प्रकरण करून त्यातून काहीतरी अघटित निर्णय घेणे, घराबाहेरील कोणत्याही बेकायदेशीर, अनैतिक कृत्यात फसणे असे प्रकार घडतात आणि मुलांचं आयुष्य बरबाद होऊन, घरातील व्यक्तींना पण प्रचंड मानसिक क्लेश सहन करावा लागतो. त्यामुळे कौटुंबिक अथवा पती-पत्नीतील वादविवाद आणि आपली आपत्य या सगळ्यांचा समतोल राखून परिस्थिती कशी सांभाळायची, याचा विचार प्रत्येक पती-पत्नीने करणे क्रमप्राप्त आहे. कौटुंबिक समजदारी वाढीस लागणे काळाची गरज आहे.

# भारतासाठी भूकमारी धोक्याची घंटा?

**२०२१चा 'ग्लोबल हंगर इंडेक्स' म्हणजेच भूक निर्देशांक जाहीर झालाय. ११६ देशांच्या यादीत भारत १०१ व्या नंबरवर आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत आपली कामगिरी फार खराब आहे. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ हे शेजारी देश आपल्यापेक्षा सरस ठरलेत. कोरोना वायरसपेक्षाही अधिक मृत्यू हे उपासमारीमुळे होत असल्याचं ऑक्सफॅमनं याआधी म्हटलं होतं. अशावेळी हा रिपोर्ट महासत्तेची स्वप्न पाहणाऱ्या भारतासाठी धोक्याची घंटा आहे.**

आज-काल

**अक्षय शारदा शरद**



कोरोना वायरसनं सर्वसामान्य माणसांचं अक्षरशः कंबरडं मोडलं. ज्यांचं हातावर पोट होतं अशा लाखो लोकांचा या वायरसनं जीव घेतला. वायरसपेक्षाही भीषण होतं ते म्हणजे घरची चूल न पेटणं. आकडेवारी आली असेल नसेल पण दोन वेळचं पुरेसं अन्न न मिळाल्यामुळे कितीतरी लोकांना या कोरोना काळात उपाशीपोटी झोपावं लागलंय. जगभर हे होत होतंच. भारतही याला अपवाद नव्हता. लॉकडाऊनच्या काळात इतर राज्यांमधल्या मजुरांचे झालेले हाल आपण टीवी, सोशल मीडियातून पाहिले असतील. अनवाणी चालतानाच्या रक्तबंबाळ पायांनी आपल्याला अस्वस्थही केलं असेल. दुसरीकडे कोरोना काळात बड्या उद्योपतींच्या वाढणाऱ्या संपत्तीच्या बातम्याही आपण ऐकल्या असतील. भारतानं महासत्ता व्हायची स्वप्न पाहणं चुकीचं नाही. पण ही स्वप्न पाहताना आपले पाय जमिनीवर हवेत. असाच आपल्याला जमिनीवर आणणारा २०२१चा 'ग्लोबल हंगर इंडेक्स' आलाय. या रिपोर्टनं जगभरातलं भूक निर्देशांकाचं वास्तव मांडत असताना महासत्तेचं स्वप्न पाहणाऱ्या भारतासाठी काही धोक्याचे इशारेही दिलेत.

असा तयार होतो रिपोर्ट

'ग्लोबल हंगर इंडेक्स' अर्थात जीएचआयचा रिपोर्ट दरवर्षी प्रकाशित होत असतो. आयर्लंडची 'कन्सर्न वर्ल्डवाइड' आणि जर्मनीची 'वेल्ट हंगर हिफ्ले' या संस्था हा रिपोर्ट तयार करत असतात. लोकांच्या पोटाची भूक भागवण्यासारख्या मूलभूत गोष्टीत जगभरातले देश नेमके कुठेयत हे या रिपोर्टमधून कळत असतं. त्यामुळेच ही आकडेवारी फार महत्वाची ठरते. जीएचआयमधे ज्या देशांचा स्कोर कमी त्यांची कामगिरी चांगली आहे असं समजलं जातं. त्यांना वरची रँक मिळते. ज्यांचा स्कोर जास्त आहे त्यांची कामगिरी मात्र खराब समजली जाते. २०३० पर्यंत भूक निर्देशांक शून्यावर आणणं हे संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास कार्यक्रमाचं एक ध्येय आहे. एखाद्या व्यक्तीमधे किती कॅलरी आहेत यावरून या ग्लोबल हंगरचा अंदाज लावला जातो. जीएचआयचा स्कोर काढण्यासाठी चार प्रमुख घटक असतात. कुपोषण, वजन, उंची आणि बालमृत्यूचं प्रमाण. स्कोरनुसार इंडेक्सचं कमी, मध्यम, गंभीर, धोकादायक, जास्त चिंताजनक असं वर्गीकरण केलं जातं. हा इंडेक्स जगभरातल्या देशांमधे उपासमारीसंबंधीची धोरणं, उपाययोजना राबवण्यासाठी मदत करत असतो.

भारत, पाकिस्तान-बांगलादेशच्या मागे

या इंडेक्समधे भारत ११६ देशांच्या यादीत १०१ व्या नंबरवर आहे. उपासमारीचं संकट अतिशय भीषण असलेल्या ३१ देशांमधे भारताचा नंबर लागतोय. २०२० मधे आपण जगातल्या १०७ देशांमधे ९४ व्या नंबरवर होतो. आपला जीएचआय स्कोर फार घसरल्याचं 'ग्लोबल हंगर इंडेक्स'च्या आकड्यांवरून स्पष्टपणे दिसतंय. २००० मधे आपला जीएचआय स्कोर हा ३८.८ टक्के होता. २०१२ला २८.८ तर २०२१ला हाच स्कोर २७.५ वर पोचलाय. भारतातली ५ पेक्षा कमी वयाची मुलं जी उंचीपेक्षाही कमी वजनाची आहेत ती १९९८ ते २००२ दरम्यान १७.१ टक्के होती. २०१६ ते २०२०ला हा आकडा १७.३ वर आला. त्यामुळे त्यांच्यात कुपोषणाचं प्रमाण किती आहेत याचा अंदाज बांधता येतो. अफगाणिस्तान, नायजेरिया, काँगो, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक, सोमालिया, येमन, हैती, लायबेरिया असे १५ देश आपल्या मागे आहेत. तर ५ पैकी कमी स्कोर मिळवत चीन, ब्राझील आणि कुवेतसारख्या १८ देशांची कामगिरी उत्तम आहे. आपले शेजारी देश म्यानमार ७१, नेपाळ ७६, बांगलादेश ७६, पाकिस्तान ९३ असा स्कोर मिळवत आपल्या पुढे गेलेत.

एका मिनिटाला ११ भूकबळी

प्रतिष्ठित अशा 'ऑक्सफॅम' या संस्थेनं 'हंगर वायरस मल्टिप्लेक्स' या नावानं जुलै महिन्यात एक रिपोर्ट प्रकाशित केला होता. अनेक महत्त्वाच्या मुद्यांकडे ऑक्सफॅमनं जगाचं लक्ष वेधलं होतं. त्यात गंभीर मुद्दा होता तो जगभर उपासमारीमुळे होत असलेल्या मृत्यूचा. कोरोना वायरसपेक्षाही अधिक मृत्यू हे उपासमारीमुळे होत असल्याचं ऑक्सफॅमनं म्हटलं होतं. उपासमारीमुळे जगभरात प्रत्येक मिनिटाला ११ लोकांचा मृत्यू होतोय. कोरोनाच्या काळात तर या संख्येत अधिकच वाढ झालीय. मागच्या वर्षभरात यात ६ टक्क्यांनी वाढ झाल्याचं निरीक्षण ऑक्सफॅमनं नोंदवलंय. जगातल्या १५.५ कोटी लोकांना पुरेसं अन्न मिळत नाहीय. मागच्या वर्षभरात यात २ कोटींपेक्षा अधिकची भर पडलीय. यातल्या दोन तृतीयांश लोकांवर उपासमारीची वेळ आल्याचं ऑक्सफॅमची आकडेवारी सांगतेय. कोरोनामुळे जगभर आलेली आर्थिक संकटं, देशादेशांमधले लष्करी संघर्ष, हवामान बदलासारखी आव्हानं यामागे आहेत. याच कारणांमुळे ५.२० कोटी लोक उपासमारीच्या विळख्यात सापडलेत. त्याचा परिणाम कोट्यवधी लोकांवर होतोय. एकत्रित प्रयत्नातून उपासमारीचं संकट कमी करायला हवं. त्यासाठी संयुक्त राष्ट्राला मदत करायची टाकून जगभरातले देश सैन्य खर्चावर अफाट खर्च करतायत असं म्हणत ऑक्सफॅमनं या देशांना आरसा दाखवलाय.

भारताचं शिकणं कमी, थयथयाट जास्त

भारताचा गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षीचा स्कोर घसरलाय. कोरोनामुळे लोकांवर जे निर्बंध लादण्यात आले त्याचा लोकांवर परिणाम झाल्याचं हा रिपोर्ट म्हणतोय. २०२२ पर्यंत भारत कुपोषण मुक्त करण्याची घोषणा केली जातेय. पण या रिपोर्टनं आपल्यासमोर थेट आरसाच धरलाय. त्यातून आपण फार काही शिकायची शक्यता कमी आहे. हा रिपोर्ट आल्यानंतर केंद्र सरकारच्यावतीने प्रतिक्रिया यायला लागल्यात. सरकारने हा रिपोर्ट फेटाळून लावत रँक देणारी ही पद्धतच अवैज्ञानिक असल्याचं म्हटलंय. केंद्रीय महिला आणि बालविकास खात्याने हा रिपोर्ट धक्कादायक असल्याचं म्हटलंय. त्यांनी हा रिपोर्ट तयार करणाऱ्या 'कन्सर्न वर्ल्डवाइड' आणि 'वेल्ट हंगर हिफ्ले' यांच्या कामावरही शंका घेतलीय. भारताला महासत्तेची स्वप्न दाखवली जातायत. निवडणुकांमधून गरीबी आणि भूकमुक्तीच्या घोषणा दिल्या जातात. सत्तेच्या राजकारणासाठी त्या बऱ्या असतात. पण प्रत्यक्षात त्या कागदोपत्रीच राहत असल्याचं चित्र आहे. ऑक्सफॅमच्या रिपोर्टनंही याकडे लक्ष वेधलं होतं. पण त्याकडे आपण दुर्लक्ष केलं. आताही आपल्याला या रिपोर्टमधून शिकण्याची संधी असताना आपला केवळ थयथयाट चाललाय.

# नवउद्योजकांना केंद्र सरकारची साथ

**कोरोना व्हायसरमुळे देशात लॉकडाऊन करण्यात आल्याने अर्थव्यवस्था पुरती मंदावली आहे. कोरोनाशी लढतात अर्थव्यवस्थेला चालना द्यावी लागेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणात म्हटले होते. कोरोनाच्या संकटाला संधी म्हणून पाहायचे आहे. आत्मनिर्भर भारत या अभियानामुळे देशभरात नवीन ऊर्जा निर्माण झाली आहे. यासाठी त्यांनी २० लाख कोटी रूपयांचे विशेष आर्थिक पॅकेज जाहीर केले.**

विशेष

**सतीश पाटणकर**

विशेष आर्थिक पॅकेजमध्ये आत्मनिर्भर भारत' योजना जाहीर करण्यात आली. ही योजना पाच खांबावर उभारली जाईल, असे म्हटले गेले. यातील पहिला खांब अर्थव्यवस्था, दुसरा खांब इन्फ्रास्ट्रचर, तिसरा खांब आपली व्यवस्था तीही तंत्रज्ञानावर आधारित, चौथा खांब लोकसंख्याशास्त्र आणि पाचवा खांब मागणी, एमएसएमई क्षेत्राला कोणत्याही गॅरंटीशिवाय ३ लाख कोटी रूपयांचे कर्ज उपलब्ध होईल. समाजातील अनेक घटकांशी संवाद साधून हे आर्थिक पॅकेज तयार करण्यात आले आहे. या पॅकेजद्वारे देशातील विकास वाढवण्याची योजना आहे. त्यामुळे आत्मनिर्भर भारत' योजना म्हटले आहे. यामध्ये सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या व्याख्येत बदल करून त्यांच्या गुंतवणूक व वार्षिक उलाढालीची मर्यादा वाढविण्यात आली आहे. या व्याख्येनुसार सूक्ष्म उद्योग १ कोटी रूपयांची गुंतवणूक व ५ कोटी रूपयांची वार्षिक उलाढाल, लघू उद्योग १० कोटी रूपये गुंतवणूक आणि ५० कोटी रूपये उलाढाल, तर मध्यम २० कोटी रूपये गुंतवणूक, १०० कोटी रूपयांची उलाढाल अशी व्याख्या करण्यात आली आहे. तसेच ५० हजार कोटी रुपयांचा एक विशेष निधीही जाहीर करण्यात आला आहे. याचा फायदा त्या उद्योगांना होईल. जे चांगली कामगिरी करत आहेत, पण निधीअभावी त्यांना अडचणी येत आहेत, अशा उद्योगासाठी हा निधी वापरला जाईल.

सरकार यात १० हजार कोटी रूपयांची गुंतवणूक करणार आहे. याशिवाय एमएसएमई क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारतर्फे केल्या जाणाऱ्या २०० कोटी रुपयांपर्यंतच्या खरेदीसाठी ग्लोबल टेंडर न काढण्याची घोषणा करण्यात आली. लघू आणि कुटिर उद्योगांसाठी सहा मोठ्या योजना, लघू आणि कुटिर उद्योगांसाठी कोणत्याही गॅरंटीशिवाय ३ लाख रुपयांचे कर्ज देण्यात येणार, ४५ लाख लघू उद्योगांना ३१ ऑक्टोबरपासून याचा फायदा मिळणार, अशा प्रकारे ही माहिती देण्यात आली आहे. अशा प्रकारे ही आत्मनिर्भर भारत योजना केंद्राने जाहीर केली आहे.

सर्व व्यवसायामध्ये ई-प्रणालीचा वापर करावा लागेल. आपला व्यवसाय व्होकल ते लोकल आणि लोकल ते ग्लोबल होण्यासाठीचा हा कसोटीचा काळ असेल. मार्केटमध्ये तुमचा माल खरेदी करण्यासाठी ग्राहकाच्या हातीही पैसा असणे आवश्यक असेल. आत्मनिर्भर योजनेतून नवीन उद्योग सुरू होतील. बेरोजगार व्यक्तींना काम मिळेल, पण कोणत्याही व्यवसायाचे साधे गणित आहे की, पहिली किमान दोन वर्ष तरी तुम्हाला व्यवसाय नो-प्रॉफिट, नो-लॉस या तत्त्वावर करावा लागतो.

कोरोनाच्या काळात आत्मनिर्भर भारत योजना आणि तरुण उद्योजकांना संधी म्हणून पाहिले, तर नव्याने व्यवसाय सुरू करण्यासाठी ही चांगली संधी आहे. पण कोरोनाच्या काळात भारतातच नव्हे, तर आशिया पॅसेफिक देशात तरुण उद्योजकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत केंद्र सरकार व्यवसाय सुरू करणाऱ्यांना १० लाख रुपयांची मदत देत आहे. या मागील उद्देश आपल्याला आपल्या पायावर उभे करणे हा आहे. कोरोना साथीच्या रोगामुळे देशातील व्यापार क्षेत्राचा वेग मंदावला आहे. या काळात अनेक व्यवसाय रखडले आहेत, तर काहींना आपला व्यवसाय बंद करावा लागला. मात्र, आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत केंद्र सरकार व्यवसाय सुरू करणाऱ्यांना १० लाख रूपयांची मदत देत व्यवसायाची संधी आहे. यामागील उद्देश आपल्याला आपल्या पायावर उभे करणे हा आहे. कोरोना काळात बंद पडलेले व्यवसाय सुरू करण्यासाठी केंद्र सरकार पुन्हा लोकांना व्यवसाय कर्जा देवून मदत करत आहे.

केंद्र सरकारच्या योजनेचा लाभ घ्या

आपल्याला स्वतःचा व्यवसाय सुरु करायचा असेल, तर केंद्र सरकार आत्मनिर्भर भारत अभिनायांतर्गत आपल्याला मदत करेल. या अतर्गत आपण नवीन व्यवसाय सुरू करू शकता किंवा आपला जुना व्यवसाय पुन्हा सुरू करू शकता. दोन्ही प्रकारच्या व्यवसायासाठी केंद्र सरकारकडून मदत केली जात आहे.

पंतप्रधान मुद्रा योजनेंतर्गत कर्ज उपलब्ध

केंद्र सरकारने पंतप्रधान मुद्रा योजना सुरू केली आहे. ही योजना अशा लोकांसाठी अधिक फायदेशीर आहे, ज्यांच्याकडे कर्ज घेण्यासाठी बँकेने निश्चित केलेल्या अटी पूर्ण करण्याची क्षमता नसते. या योजनेंतर्गत देशातील कोणताही नागरिक ज्याच्याकडे कुटिर उद्योग किंवा कोणतीही भागीदारी कंपनी असेल तो कर्ज मुद्रा लोन घेऊ शकतो.

तीन टप्प्यांत दिले जाईल कर्ज

पंतप्रधान मुद्रा योजनेंतर्गत तीन टप्प्यांत कर्ज दिले जाते. सरकारने यामध्ये शिशू लोन, किशोर लोन आणि तरुण लोन अशी विभागणी केली आहे.

शिशू कर्ज योजना : या अंतर्गत दुकान उघडण्यासाठी ५०,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतले जाऊ शकते.

किशोर कर्ज योजना : या योजनेंतर्गत ५०,००० रुपयांपासून ते ५ लाखांपर्यंत कर्ज घेतले जाऊ शकते.

तरूण कर्ज योजना : जर तुम्हाला लघू उद्योग स्थापित करायचा असेल, तर तुम्ही ५ लाख रुपयांपासून १० लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकता.

कोणाला मिळू शकते कर्ज

पंतप्रधान मुद्रा योजना लघू उद्योजक आणि व्यावसायिकांसाठी आहे. जर तुम्हाला एखादा मोठा व्यवसाय सुरू करायचा असेल, तर त्या अंतर्गत तुम्हाला कर्ज मिळू शकत नाही. या योजनेंतर्गत लघुउद्योग असेंब्लिंग युनिट्स, सर्व्हिस सेक्टर, दुकानदार, फळ/भाजी विक्रेते, ट्रक ऑपरेटर, फूड सर्व्हिस युनिट्स, रिपेअर शॉप्स, मशीन ऑपरेटर, लघू उद्योग, कारागीर आणि फूड प्रोसेसिंग युनिटसाठी कर्ज घेऊ शकता.

कोठे मिळते कर्ज?

पंतप्रधान मुद्रा योजनेंतर्गत सरकारी बँकांकडून कर्ज घेतले जाऊ शकते. ग्रामीण बँकांदेखील यासाठी कर्ज देत आहेत. सहकारी बँकांकडूनही कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. आरबीआयने अधिकृत केलेल्या २७ बँका या योजनेंतर्गत कर्ज देऊ शकतात. यामध्ये खासगी क्षेत्रातील १७ बँका, ३१ ग्रामीण बँका, ४ सहकारी बँका, ३६ मायक्रो-फायनान्स बँका आणि २५ बिगर-बँकिंग क्षेत्रातील फायनान्स कंपन्या आहेत. याविषयी अधिक माहितीसाठी आपण मुद्रा.ओआरजी.इन वर लॉग इन करू शकता. येथे तुम्हाला योजनेची संपूर्ण माहिती मिळेल.



(लेखक मुख्यमंत्र्यांचे माजी माहिती अधिकारी आहेत)

# बळीराजाने उत्पन्न वाढीकडे लक्ष द्यावे : पंजाब डख

## सुंदरराव सोळंके साखर कारखान्याच्या गळीत हंगामास प्रारंभ





▶ प्रतिनिधी

तेलगाव : माजलगाव मतदारसंघातील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याने नावलौकिक निर्माण केला आहे. परिसरातील या कारखान्यावर अवलंबून असलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उत्पन्न वाढीकडे लक्ष द्यावे, असे आवाहन हवामान अभ्यासक पंजाब डख यांनी तेलगाव येथे केले.

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन २०२१-२२ या ३० व्या ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ रविवार, दि.१७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे मार्गदर्शक तथा माजी मंत्री, आमदार प्रकाश सोळंके होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून हवामान अभ्यासक पंजाबराव डक, चेअरमन धैर्यशील सोळंके होते. यावेळी व्यासपीठार जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंह सोळंके, मुंबई बाजार समिती सभापती अशोक डक, बाबुराव पोटभरे, माधव निर्मळ, सभापती कल्याण आबुज आदि उपस्थीत होते. यावेळी ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभहस्ते गव्हाणीत ऊसाची मोळी टाकुन शुभारंभ करण्यात आला. पुढे बोलताना डख म्हणाले. गेल्या दीड-दोन वर्षात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन करण्यात आल्याने देशभरातील सर्व कंपन्या, उद्योगधंदे आदी बंद होते. मात्र आपल्या बळीराजाचीच एकमेव कंपनी चालू होती. या दरम्यान शेतकऱ्यांनी दूध, अन्नधान्य, भाजी नागरीकांना पुरवण्याचे काम केले असे प्रतिपादन व्यक्त करुन शेतकऱ्यांनी ऊसाची एकरी क्षेत्र वाढवण्यापेक्षा उत्पन्न वाढीसाठी टनेज वाढवावे, असे आवाहन हवामान अभ्यासक पंजाब डक यांनी लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी उपस्थित ऊस उत्पादकांना केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना पंजाबराव डक म्हणाले की, मी फक्त हवामानावरून अंदाज व्यक्त करत असतो. रविवारपासून हवामान कोरडे राहणार असून ३ नोव्हेंबर पासून राज्यात थंडीला सुरुवात होणार आहे. भारत कृषीप्रधान देश असुन ८० टक्के लोक शेती करतात त्यात ५० टक्के शेतकरी जिरायती तर ३० टक्के शेतकरी बागायती शेती करतात तर उर्वरीत २० टक्के लोक नोकरी करतात असे सांगत ते पुढे म्हणाले की, १९९५ पर्यत पावसाचे प्रमाण चांगले होते. परंतु नंतरच्या काळात औद्योगिक क्षेत्र वाढल्याने प्रदुषण वाढले याचा परिणाम निसर्गावर होऊन पावसाचे प्रमाण कमी झाले. मात्र गेल्या दोन-तीन वर्षात पावसाचे पुन्हा चांगले आगमन झाले असून भविष्यातही काही वर्षे हे प्रमाण चांगले राहणार आहे. पूर्वी ३८ ते ४० अंश असे तापमान असायचे मात्र गेल्या काही वर्षात हे तापमान ४५ अंशापेक्षा जास्त होत आहे. कारण पृथवीचे तापमान वाढत असल्यामुळे पाऊस पडत आहे. पृथ्वीचे तापमान नियंत्रणात ठेवणे गरजेचे असून यासाठी प्रत्येक व्यक्तीने किमान एकंतरी झाड लावावे. वृक्ष लागवडीमुळे तापमान नियंत्रणात येण्यास मदत होते असे सांगून ऊस उत्पादकांसाठी आगामी काळ चांगला असून शेतकऱ्यांनी ऊसाचे टनेज वाढीसाठी प्रयत्न करावेत असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेअरमन धैर्यशील सोळंके यांनी करून कारखान्याच्या आजपर्यतच्या कामाचा आढावा घेवून चालु हंगाम हा मोठा हंगाम असून या हंगामात मोठ्या प्रमाणात ऊस गाळप करण्यासाठी सर्व ऊस उत्पादक शेतकरी, तोड वाहतुक ठेकेदार यांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास सर्व संचालक मंडळ, यांचेसह कारखान्याचे कार्यकारी संचालक महादेव घोरपडे, सर्व खातेप्रमुख, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार संचालक प्रकाश शिंदे यांनी केले.

### 'पंचक्रोशीतील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले'

आशिर्वादपर भाषणात ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर म्हणाले की, लोकनेते सुंदररावजी सोळंके यांनी लावलेले हे रोपटे प्रकाश सोळंके व धैर्यशील सोळंके यांनी मोठ्या कष्टाने वाढवत असून या कारखान्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावत असून त्यांची आर्थिकदृष्ट्या प्रगती होण्यास मदत होत आहे. शेतकऱ्यांनीही हा कारखाना आपलाच आहे हे समजून आमदार प्रकाश सोळंके आणि धैर्यशील सोळंके यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे असे आवाहन त्यांनी केले.



# प्रधानमंत्री आवास योजनेच्या ११० लाभार्थ्यांना धनादेश वितरित

## एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही : नगराध्यक्ष

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील नगर पालिकेमार्फत राबवण्यात आलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना गुरूवारी ५६ लाख रूपयांच्या अनुदानाचे धनादेश वितरित करण्यात आले. या योजनेतील एक ही पात्र लाभार्थी वंचित राहणार नसल्याचे नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी यावेळी सांगितले.

शहरातील गरजू बेघर नागरिकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना प्रभावीपणे राबविली जात आहे. आतापर्यंत १ हजार १४४ घरकूल मंजूर करण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात ४४२ लाभार्थ्यांना प्रत्येकी ४० हजार प्रमाणे १ कोटी ७६ लाख रूपये वाटप करण्यात आले. तर दुसऱ्या हप्त्यात २६० लाभार्थ्यांना ६० हजार रूपयांप्रमाणे प्रमाणे १ कोटी ५६ लाख आणि तिसऱ्या हप्त्यात १७७ लाभार्थ्यांना १ लाख रुपये प्रत्येकी प्रमाणे १ कोटी ७७ लाख रूपये वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे रमाई आवास योजनेतूनही ९४ लाभार्थ्यांना एक लाख रूपयाप्रमाणे ९४ लाख रूपये वाटप करण्यात आले आहेत. असे एकूण आतापर्यत ६ कोटी ५ लाख रूपयांचे वाटप करण्यात आल्याचे शेख मंजूर यांनी सांगितले. तसेच गुरूवारी ११० लाभार्थ्यांना धनादेशाचे वितरण करण्यात आले आहेत.

## चाटगाव शाळेसाठी वर्गखोल्यांची मागणी



धारूर : तालुक्यातील मौजे चाटगाव येथील इयत्ता सातवी आणि आठवीसाठी वर्ग खोल्या बांधण्यात याव्यात, अशा मागणीचे निवेदन जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांना देताना शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष बाबासाहेब पंढरी केकान.


## जाहीरनामा

फाईल क्रमांक- प्रकरण- मालमत्ताकर रजिस्टरवर अर्जदाराचे नावाचे संबंधी अर्जदाराचे नाव निर्मलाबाई भिकू देशमाने सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, प्लॉट नं.-वार्ड नं.- घर नंबर-२६/१६८५ साईज-३० बाय १० फूट वर भिकू बाबुराव देशमाने यांचे नांव या कार्यालयातील मालमत्ताकर रजिस्टरवर आहे. वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घराचे नांव बदलण्यास अर्ज केला आहे. या विषयी कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चतुःसिमा :- पूर्व- परसराम धारक, पश्चिम- सर्जेराव तुकाराम क्षीरसागर, दक्षिण- नियोजित रस्ता, उत्तर- विभुतीचा शिल्लक प्लॉट

दि. ०४ ऑक्टोबर २०२१

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, माजलगाव**


### माधवराव बुरंगे यांचे वृध्दापकाळाने निधन

▶ प्रतिनिधी



माजलगाव : तालुक्यातील खतगव्हाण येथील शेतकरी व मुद्रांक विक्रेते अशोकराव बुरंगे पाटील यांचे वडील माधवराव बुरंगे (वय ८० वर्ष) यांचे दि.१५ रोजी रात्री ९:३०वाजता वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खतगव्हाण येथे अंतिमसंस्कार झाले. त्यांचे पश्चात दोन मुले व एक मुलगी, सुना, जावाई, नातू, नातसूना असा मोठा परिवार आहे.

# पतसंस्थांनी स्थैर्यनिधीची स्थापना करावी

## राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांची सूचना

▶ प्रतिनिधी

माजलगाव : पतसंस्थेतील ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहतील याकरिता स्थैर्यनिधीची स्थापना करावी. या माध्यमातून पतसंस्थेतील ठेवी निश्चितच सुरक्षित राहणार असल्याचे आवाहन राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी व्यक्त केले. जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी माजलगाव येथे एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे सोमवारी आयोजन केले होते. यावेळी कोयटे बोलत होते.

यावेळी सभापती जयसिंह सोळंके, रविंद्र कानडे, अ‍ॅड.भानुदास डक, शहाजी शेजुळ, माजलगाव पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सतिष सावंत, उपाध्यक्ष अनंत शेंडगे, सचिव संजय सपाटे, बाळासाहेब सोळंके, राहुल फुलगे, रंजित टाकणखार, दिलीप पारेकर उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षक संदीप पाटील यांनी स्पर्धेच्या युगात ग्राहकाला दर्जेदार सुविधांसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन केले. संचालन संजय सपाटे यांनी केले. जयसिंह सोळंके यांनी आभार मानले. पतसंस्था एकसंघ होण्यासाठी तालुकास्तरीय फेडरेशनची स्थापना करण्यात आली. त्याच धर्तीवर पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहण्याकरिता पतसंस्था जिल्हा स्थैर्यनिधीची लवकरच स्थापना होणार असून, त्याकरिता निश्चितच पुढाकार घेऊन लवकरात लवकर अंमलबजावणी करणार असल्याचे सतिष सावंत यानी सांगितले.



# सरकारने सुवर्ण व्यापाऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करू नये : बेद्रे

## माजलगावात हॉलमार्क व एचयुआयडी मेळावा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : सोन्याचा भाव आणि त्याची शुद्धता याविषयी समाजात अनेक समज गैरसमज आहेत. त्यावर उपाय म्हणून केंद्रशासनाने १५ जूनपासून हॉलमार्क व एचयुआयडी कायद्याची अंमलबजावणी केली आहे. या कायद्यात सुवर्णकार बांधवासाठी अनेक जाचक अटी लादल्या आहेत. यामुळे सराफा दुकानदार व्यापारी कमी अन् कारकून काम जास्त झाले आहे. या कायद्यातील त्रुटी दूर करून केंद्रशासनाने व्यापार्याच्या अडचणी सोडवाव्यात, असे प्रतिपादन सुवर्णकार फेडरेशनचे मराठवाडा अध्यक्ष गणेश बेद्रे यांनी केले आहे. रविवारी शुभगंगा मंगल कार्यालयात सुवर्णकार फेडरेशन माजलगाव यांच्यावतीने आयोजित हॉलमार्क व एचयुआयडी मेळाव्यात बेद्रे बोलत होते.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष सुरेंद्र रेदासनी होते. संत शिरोमणी नरहीर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. दीपप्रज्वलनाने मेळाव्याची सुरुवात करण्यात आली. यावेळी मंचावर सुवर्णकार फेडरेशन राज्यसचिव मंगेश लोळगे, परभणी जिल्हाध्यक्ष सचिन अंबिलवादे, सल्लागार गणेश बागडे, बीआयएस आधिकारी प्रज्योत दहीकर, शिनु गंगाराडे, मार्गदर्शक राजाभाऊ निर्मळ, उपाध्यक्ष सुधाकर दहीवाळ, उपाध्यक्ष अनिल चिद्रवार, भास्करराव टाक, प्रभाकर कुलथे, मार्गदर्शक अनंतराव रुद्रवार, आर्यवैश्य महासभा जिल्हाध्यक्ष सुमित रुद्रवार, केजचे तालुकाध्यक्ष गोविंद कणसे, वडवणीचे तालुकाध्यक्ष विठ्ठल आंधळे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष शेख जुनैद, रामेश्वर शहाणे यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना बेद्रे म्हणाले, सुवर्णकार व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी फेडरेशन कटीबद्ध असून सर्वांनी एकजूटेने काम करण्याची आवश्यकता आहे. अध्यक्षस्थानावरून सुरेंद्र रेदासनी बोलतांना म्हणाले, माजलगाव सराफा फेडरेशनने हा नेत्रदिपक मेळावा आयोजित करून व्यापारी बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्याबद्दल माजलगाव सराफा फेडरेशनचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. यावेळी बोलतांना सचिन अंबिलवादे म्हणाले, फेडरेशनने केंद्रशासनाकडे व्यापार्याच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी पत्रव्यावहार केला आहे. पण शासनाने आजपर्यत एकाही पत्राचे उत्तर दिलेले नाही ही खेदजनक बाब आहे. राज्यसचिव मंगेश लोळगे बोलतांना म्हणाले, छोट्या छोट्या सराफा व्यापाऱ्यांचे अनेक प्रश्न सोडवले असून यापुढेही सराफांच्या समस्या सोडविण्यासाठी एकदिलाने एकजूटेने काम करावे. या मेळाव्यासाठी अनंत रुद्रवार, लक्ष्मीकांत मानधने, उल्हास रुद्रवार, प्रकाश चव्हाण, राजु दाभाडे, सुरेश सोळंके, मंचक थोरात, सुधाकर देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले .मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सराफ सुवर्णकार फेडरेशन तालुकाध्यक्ष रामराजे रांजवण ,उपाध्यक्ष नारायण सातपुते, सचिव गजानन बोकन, कोषाध्यक्ष गणेश उगले, संघटक रवींद्र मानधने, लखन देशमुख, रफीक अत्तार, निळकंठ महाजन,यांनी परीश्रम घेतले. चैतन्य आहेरने गायलेल्या वंदेमातरम गीताने मेळाव्याची सांगता झाली.



### वीज वितरण कंपनीच्या मनमानीमुळे नागरिक वैतागले

▶ प्रतिनिधी

माजलगाव : गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या तरी वीज वितरण कंपनीच्या मनमानी कारभारामुळे वीज गायब होते. या प्रकारामुळे माजलगाव तालुक्यातील नागरिक हैराण झाले आहेत.

माजलगाव शहरात रात्र-रात्र तर कधी दिवस-दिवस वीज गायब होत आहे. यातच सध्या डासांचा त्रास, उकाड्याने रात्र जागून काढण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. वीज वितरण कंपनीच्या माजलगाव उपविभागात माजलगाव शहरासह ९० गावे, वस्ती, तांडे येतात. या उपविभागात वीज बिल भरणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने मागील अनेक वर्षापासून माजलगाव शहरात लोडशेडिंग बंद आहे. मागील दोन महिन्यांपासून वारंवार पाऊस येत असल्याने थोडा जरी पाऊस झाला तर शहरातील व ग्रामीण भागातील वीज गायब होते. वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना वारंवार होत असलेले बिघाड वेळेत दुरूस्त होत नसल्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. शहरातील अनेक ठिकाणच्या विद्युत तारा जीर्ण झाल्याने थोडीही हवा आली की तुटून पडतात. सध्या शहरातील अनेक ठिकाणच्या तारा तुटत आहेत.



# राष्ट्रवादी युवक काँग्रेसची माजलगाव तालुका कार्यकारिणी घोषित

▶ प्रतिनिधी


माजलगाव : माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसची माजलगाव तालुका कार्यकरणी नुकतीच जाहीर करण्यात आली. या कार्यकरणीत युवकांनाच स्थान देवून पक्ष बळकटीचे आवाहन करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आचार विचार व ध्येय धोरण तळागाळातील लोकांपर्यत पोहचवून गाव तेथे राष्ट्रवादी,घर तेथे राष्ट्रवादी कार्यकर्ता निर्माण करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बांधणी चालू असुन, याच दृष्टीने राष्ट्रवादी युवक काँग्रेसची माजलगाव तालुका कार्यकरणी नुकतीच जाहीर करण्यात आली. माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, बीड जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयसिंह सोळंके यांच्या मान्यतेने तालुकाध्यक्ष पदाची निवड यापुर्वीच जाहीर केली असुन, उर्वरित कार्यकरणी वरिल नेत्यांच्या मान्यतेने व राष्ट्रवादी काँग्रेसचे माजलगाव तालुकाध्यक्ष रमेश सोळंके, माजी पं.स.सदस्य दिनेश गायकवाड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस भागवत दराडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजलगाव तालुकाध्यक्ष नितीन जाधव, शरद बोरचाटे, राष्ट्रवादी विद्यार्थी आघाडीचे शहरअध्यक्ष क्षितीज गायकवाड आदींच्या उपस्थितीत नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या कार्यकारिणीत तालुका उपाध्यक्ष म्हणून अंगद तांबे, गणेश कदम, नवनाथ चव्हाण, शुभम भोसले या चौघांची तर कोषाध्यक्षपदी अविनाश डाके, सरचिटणीस म्हणून ज्ञानेश्वर आबुज, चिटणीसपदी गोविंद मोरे, तालुका संघटक म्हणून गोविंद धुमाळ अशा प्रकारे तालुका कार्यकरणी जाहीर केली आहे. सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा एका छोटेखानी कार्यक्रमात नियुक्तीपत्रे देवून सत्कार करण्यात आला.

# रक्तदान हेच सर्वश्रेष्ठदान : आमदार प्रकाश सोळंके

## डॉ.वसिम मनसबदार यांच्या वाढदिवसानिमित्त शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी



माजलगाव : रक्तदान हेच सर्वश्रेष्ठदान आहे. युवकांनी रक्तदान करून आपले समाजाप्रती असलेले सामाजिक दायित्व दाखवून द्यावे, असे आवाहन आमदार प्रकाश सोळंके यांनी केले. ते रविवारी पात्रुड येथे रक्तदान शिबिरात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

माजलगाव पंचायत समितीचे उपसभापती डॉ.वसिम मनसबदार यांच्या वाढदिवसानिमित्त पात्रुड येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे ९१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. डॉ.वसिम मनसबदार यांच्या वाढदिवसा निमित्त सामाजिक जाणिवेतून पात्रुड येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिराला माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके, जयदत्त नरवडे, पात्रुडचे सरपंच ॲड.कजिम मनसबदार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



# भटक्या विमुक्तांच्या आरक्षणाला हात लावाल तर याद राखा : बंडू खांडेकर

प्रतिनिधी



माजलगाव : भटक्या विमुक्तांना नोकरीत पदोन्नती देता येणार नाही असे प्रतिज्ञापत्र राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात सादर केल्याने राज्यातील हजारो भटक्या समाजातील कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये राज्य शासनाच्या विरोधात संतापाची भावना निर्माण झाली आहे. भटक्या विमुक्तांच्या पदोन्नती मधील आरक्षणाला हात लावाल तर याद राखा असा इशारा भाजपा भटके विमुक्त आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष बंडू खांडेकर यांनी दिला आहे.

भटक्या विमुक्तांना नोकरीत पदोन्नती देता येणार नाही असे प्रतिज्ञापत्र राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहे. दऱ्या खोऱ्यात व पालावर राहून भटकंती करुन जीवन जगणाऱ्या भटक्या समाजाबद्दल सरकारच्या मनात आकसाची भावना आहे. एकंदरीत आरक्षण रद्द करण्याचे पाप व डाव सरकारच्या मनात आहे. परंतु आमच्या आरक्षणकडे वाकड्या नजरेने पाहिले तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा बंडू खांडेकर यांनी दिला आहे.

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे हरवलेल्या महिलेचा लागला शोध

प्रतिनिधी

दिंद्रुड : बीड-परळी महामार्गावर एक वयोवृद्ध महिला चालत दिंद्रुड पोलीस हद्दीत आली होती. दिंद्रुड येथील आशा सेविका मंदा देशमाने यांनी सदर महिलेची विचारपूस केली असता ती भोळसर असुन हरवली असल्याचे लक्षात आले. देशमाने यांनी या महिलेस दिंद्रुड पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी सतर्कता दाखवत काही तासात सदर महिलेच्या नातेवाइकांचा शोध लावत त्यांच्या ताब्यात महिलेला दिले. या घटनेमुळे दिंद्रुड पंचक्रोशीत दिंद्रुड पोलीस व आशा सेविका देशमाने यांचे कौतुक होत आहे.



बीड येथील खैरू बेगम हि भोळसर वयोवृद्ध महिला बीड पासुन ५५ किमी अंतरापर्यंत चालत दिंद्रुड ऊन परळी च्या दिशेने जात होती. सोमवारी दुपारी सदर महिलेने घर सोडले असल्याचे माहिती आहे. सदर महिला दिंद्रुड येथे मंगळवारी पहाटे आली असता येथील आशा सेविका मंदा देशमाने यांना ती हरवली असल्याचे लक्षात आले. त्यांनी या महिलेस विचारपूस केली असता महिलेला नातेवाईकांचे नावही सांगता येत नव्हते. देशमाने यांनी सदर महिलेस जेवण देत पोलिसांच्या स्वाधीन केले. दिंद्रुड पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभा पुंडगे व पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर राडकर यांनी या महिलेच्या नातेवाइकांचा शोध घेण्यासाठी तात्काळ दखल घेतल्याने बीड येथील ही महिला असल्याचे निष्पन्न झाले. मंगळवारी दुपारी खैरू बेगम यांच्या नातेवाईकांनी ओळखत पटवल्यानंतर तिला दिंद्रुड पोलिसांनी ताब्यात दिले.

# विद्यार्थ्यांना 'हात धुण्याचे' धडे

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील राजेगाव येथील सरस्वती विद्यालयात स्वच्छ भारत मिशन, बीड जिल्हा परिषदेच्या वतीने गुरूवारी जागतिक हात धुणे दिन साजरा करण्यात आला.

हात न धुतल्यामुळे अनेक रोगांचा प्रसार होतो. व्यक्तीला आरोग्यमय जीवन जगायचे असेल तर हात धुणे आवश्यक आहे. यामुळे हात धुण्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना



दाखवण्यात आले. यावेळी ग्रामसेवक राजेंद्र घमाट, मुख्याध्यापक मनोज सोळंके, अशोक कचरे, भारत गुंदेकर, गणेश महाजन, मुरलीधर भाळशंकर, बाळासाहेब झोडगे, दीपक कवडे, अनंत राठोड, विशाल सोळंके, सय्यद गयास, मनिषा शिंदे, अमर राऊत, तुळशीराम साळवे, कैलास कदम, मिलिंद देशपांडे, ओमप्रकाश कचरे, रविंद्र साळवे, ग्रामपंचायत कर्मचारी बाबू साळवे, भागवत सागुते, सुनिल साळवे यांची उपस्थिती होती.

## नगरपालिकेची वृक्षसंवर्धन मोहीम



माजलगाव : नगरपालिकेने वृक्षसंवर्धन मोहीम हाती घेतली आहे. शहरात विविध ठिकाणी टँकरने पाणी घालण्यात येत आहे. सन्मित्र कॉलणीत वृक्षांची पाहणी करताना नगराध्यक्ष शेख मंजूर.

# शेतकऱ्याच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ

## शासनाने गंभीर लक्ष घालावे : भाई ॲड.नारायण गोले पाटील

प्रतिनिधी



बीड : गेवराई तालुक्यातील कांबी परिसरात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे काही शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे शासनाने गंभीरपणे लक्ष घालावे, अशी मागणी शेकाप नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी केली आहे. दरम्यान, या प्रश्नी शासनाने दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

गेवराई तालुक्यातील कांबी बुद्रुक व कांबी खुर्द या दोन्ही गावचे तलाव अतिवृष्टीच्या पावसामुळे फुटल्याने जवळपासच्या आठ ते दहा गावांतील शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी शेतातील उभ्या पिकासह पूर्णत: तीन फुटापेक्षा जास्त, जास्तीत जास्त १० फूट वाहून गेल्या आहेत, त्यामुळे त्या जमिनीत चार ते पाच वर्ष कोणतेही हे पीक येणार नाही अशी गंभीर परिस्थिती आहे. नंदपूर, चिंचोली, चिंचोली खुर्द, खेर्डा, भेंड टाकळी, कांबी खुर्द, कांबी बुद्रुक आदी गावातील शेकडो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येत आहे. अशा परिस्थितीत पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी, त्यांच्या मागण्या शासन दरबारी लावून धरण्यासाठी, येत्या काळात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याच्या पार्श्वभूमीवर, आज प्रत्यक्ष जय मोक्यावर नंदपूर येथे जावून बांधावरील शेतकऱ्याची व्यथा जाणून घेऊन त्यांना न्याय



मिळवून देण्यासाठी आंदोलन उभे करण्याचा शब्द दिला आहे. यावेळी नंदपूर येथील शेतकरी बांधवांच्या व्यथा करताना भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी जाणून घेतल्या. यावेळी भाई गणेश कदम, संभाजी चव्हाण, राजाभाऊ घोडके, चंद्रसेन उबाळे आदींची उपस्थिती होती.

# अस्मानी संकटात शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज

## 'मनकॉट'च्या शुभारंभाप्रसंगी सभापती संभाजी शेजुळ यांचे आवाहन

प्रतिनिधी



माजलगाव : अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना धीराने तोंड देण्यासाठी सहकार्य करण्याची गरज आहे, असे आवाहन माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ यांनी केले. ते मनकॉट जिनिंग या खाजगी कापूस खरेदी केंद्राच्या शुभारंभाप्रसंगी शुक्रवारी बोलत होते.

याप्रसंगी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अच्युतराव लाटे, संचालक प्रभाकरराव होके, सुहासराव सोळंके, माजी पंचायत स.सभापती जयदत्त नरवडे, सचिव हरिभाऊ सवणे, रामेश्वर टवाणी, रामूशेठ चांडक यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना सभापती संभाजी शेजुळ यांनी मार्गदर्शन केले. मनकॉट जिनिंग येथे खाजगी कापूस खरेदी केंद्राच्या शुभारंभाप्रसंगी सभापती संभाजी शेजुळ म्हणाले, माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत आहे. बाजार समितीने आजपर्यंत शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या. शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेवून आपल्या जीवनात प्रगती साधावी, असेही प्रतिपादन शेजुळ यांनी केले.



### सात हजार दर दिल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात आनंद

यंदा बीड जिल्ह्यातील शेतकरी अतिवृष्टीच्या संकटात सापडलेला आहे. अशा परिस्थितीत खाजगी कापूस खरेदी केंद्राने प्रारंभी ७००१ रूपये क्विंटल दराने कापूस खरेदी सुरू केल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. संकटात सापडलेल्या बळीराजाला बळ देण्यासाठी प्रत्येक घटकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. व्यापाऱ्यांनी कापूस खरेदी करताना शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव द्यावा, असे आवाहन 'वर्तमान'शी बोलताना सभापती संभाजी शेजुळ यांनी केले.

# पालावर साजरा झाला विजयादशमीचा आनंद

## तब्बल ३०० साड्यांचे वाटप; संकेत खामकरचा पुढाकार

प्रतिनिधी



माजलगाव : युवा समाजसेवक संकेत खामकर आणि टीमने विजयादशमीचा आनंद पालवरील भटक्या समाजासमवेत साजरा केला. दसऱ्यानिमित्त पालावरील महिलांना तब्बल ३०० साड्यांचे वाटप करण्यात आले.

संकेत खामकर या युवकाने कोरोना काळात आपल्या परीने योगदान दिलेले आहे. तब्बल १० दिवस पालावरील लोकांना भोजनव्यवस्था केल्याने चर्चेत



आलेल्या युवा समाजसेवक संकेत खामकर आणि टीमने दसऱ्यानिमित्त साड्या वाटप करून नवा आदर्श पायंडा पाडला आहे. त्याच्या या सामाजिक बांधिलकीचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. त्याच्या साथीला साथ देण्याचे सहकारी मित्र शाम घटे, वैभव राऊत, विष्णू जोगडे, सचिन कराळे, अर्जुन कदम, ऋषिकेश केंद्रे, चेतन उघडे, शंकर कदम, ओंकार सावंत, गोविंद बुरंगे, वैभव डुकरे, युवराज जोगडे, बालाजी क्षीसागर, अनिकेत कदम, रोहन जोगडे, पांडू सारफळकर यांनी केले.










आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.